| | |
|---|---|
| MHRG110009542025 | दाखल तारीख – १४.११.२०२५ |
| | नोंदणी तारीख – १४.११.२०२५ |
| | निकाल तारीख – ०६.०६.२०२६ |
| | कालावधी – ०० वर्षे, ०६ महिने, २२ दिवस |

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड यांचे न्यायालयात**

**पिठासिन अधिकारी – श्रीमती अ.प्र.मानव (अ.ब.सोनटक्के)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.५४५/२०२५ निशाणी क्र. ११/क**

| | |
|---|---|
| प्रथम खबर अहवाल क्रमांक | १५/२०२५ |
| गुन्हयाचा तपशील व पोलीस ठाणे | दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क महाड क्र.२ विभाग, जि. रायगड |
| निकालाचा दिनांक | ०६.०६.२०२६ |
| अभियोग पक्ष | दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क महाड क्र.२ विभाग, जि. रायगड |
| अभियोग पक्षातर्फे वकील | श्री. पी. जे. गावंड सहाय्यक सरकारी अभियोक्ता |
| आरोपी | **पांडुरंग लक्ष्मण पवार**<br>वय – ६१ वर्षे, |

| | |
|---|---|
| | राहणार – वांजलोशी, आदिवासीवाडी, साई ता. तळा, जि. रायगड. |
| आरोपीतर्फे वकील | श्री. आर. जे. पांढरे |

## भाग 'ब'

## [फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ४, परिच्छेद ४४ (ii)]

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०२.०३.२०२५ |
| प्रथम खबरी अहवालाचा दिनांक | ०२.०३.२०२५ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | १४.११.२०२५ |
| दोषारोप नोंदविल्याची तारीख | ०६.१२.२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ३१.०१.२०२६ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याची तारीख | लागु नाही |
| न्यायनिर्णय घोषित तारीख | ०६.०६.२०२६ |
| शिक्षा दिली असल्यास ती तारीख | लागु नाही |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्या | आरोपीने केलेला गुन्हा | निर्दोष मुक्तता किंवा दोषी | सुनावण्यात आलेली | संपरिक्षेदरम्यान आरोपी न्यायबंदी |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | चा दिनांक | | | शिक्षा | असलेला कालावधी |
| १. | पांडुरंग लक्ष्मण पवार | सी.आर. पी.सी. कलम ४१अ/१ अन्वये नोटीस | -- | मुंबई दारुबंदी कायदा कलम ६५(ई). | निर्दोष मुक्तता | लागु नाही | लागु नाही |

**अभियोगपक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोगपक्ष –**

| **अनु. क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **निशाणी क्रमांक** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|---|
| १. | गणेश गोविंद चाचणे – साक्षीदार क्र.१ | ०३ | पंच |
| २. | अमीत शाम भगत – साक्षीदार क्र.२ | ०६ | फिर्यादी |
| ३. | सदाशिव सखाराम मोडके – साक्षीदार क्र.३ | ०९ | पंच |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार असल्यास –**

| अनु. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन साक्षीदार असल्यास –**

| अनु. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**अभियोगपक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन निशाण्यांची यादी**

**अ. अभियोगपक्ष –**

| **अनु. क्र.** | **स्वरुप** | **निशाणी क्रमांक** |
|---|---|---|
| १. | तक्रार | ०७ |
| २. | मुद्देमाल रासायनिक परिक्षणासाठी पाठविलेले पत्र | ०८ |

**ब. बचाव पक्ष –**

| **अनु. क्र.** | **निशाणी क्रमांक** | **स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन निशाणी –**

| **अनु. क्र.** | **निशाणी क्रमांक** | **स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय

(दिनांक ०६.०६.२०२६ पारित केला.)

आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारु बंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा केल्याचा दोषारोप ठेवणेत आलेला आहे.

### अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत

२. सदर प्रकरणात ए. एस. भगत, ब.क्र.३५, दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, महाड क्र.२ विभाग, ता.माणगांव, जि.रायगड हे फिर्यादी आहेत. दिनांक ०२.०३.२०२५ रोजी फिर्यादी व त्यांचे सहकारी असे मिळुन मिळालेल्या बातमीनुसार खाजगी वाहनाने मौजे वांजळोशी, साई या ठिकाणी गेले. तेथे गावच्या पश्चिमेकडील बाजुस कच्च्या झोपडीमध्ये दारुबंदी गुन्ह्याअंतर्गत छापा टाकला. एक पुरुष इसम याने अवैद्यरित्या प्लॅस्टीक ड्रम, प्लॅस्टीक कॅन, बरण्या फुगे गावठी हातभट्टी दारुने भरलेल्या विक्रीच्या उद्देशाने ठेवलेले मिळून आला. म्हणून ए. एस. भगत यांनी आरोपीविरुध्द सरकारतर्फे फिर्याद दिली.

३. सदरच्या फिर्यादीप्रमाणे रा.उ.शु., महाड क्र.२ गुन्हा नोंदणी क्र.१५/२०२५ नोंदविला. गुन्ह्याचा तपास डी. वाय. वाडेकर, दुय्यम निरीक्षक रा.उ.शु. महाड क्र.२ विभाग यांनी केला. तपासाअंती आरोपीविरुध्द पुरावा मिळून आल्याने त्यांनी दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारु बंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे गुन्ह्याचा आरोप नि.क्र.०२ वर नोंदविण्यात आला. आरोपीने आरोप कबूल नसल्याचे सांगून त्यांची संपरिक्षा करण्याची विनंती

केली. आरोपीने संपूर्ण घटना नाकारली व त्याचेविरुध्द खोटी फिर्याद दाखल केल्याचे कथन केले. अभियोग पक्षाचा सबळ पुरावा मिळून आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३१३ अन्वये निवेदन निशाणी क्र.१० वर नोंदविण्यात आले.

**५.** अभिलेखातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता व अभियोग पक्षातर्फे श्री. प्रशांत गावंड सहा.सरकारी अभियोक्ता व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर. जे. पांढरे यांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर प्रस्तुत प्रकरणाच्या निर्णयाप्रत पोहचण्याकरीता खालील मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्द्यांवरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविले आहेत–

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, दिनांक ०२.०३.२०२५ रोजी मौजे वांजळोशी, साई ता. तळा, जि. रायगड येथे आरोपीने त्याच्या ताब्यात गावठी हातभट्टीच्या दारुचा साठा विना परवाना अवैधरित्या जवळ बाळगला व त्याद्वारे आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| २. | काय आदेश ? | अंतिम |

आदेशानुसार.

## कारणमिमांसा

६. अभियोग पक्षाने आरोपीविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्याकरीता तीन साक्षीदारांची साक्ष नोंदविली आहे. अभियोग पक्षातर्फे पंच साक्षीदार गणेश गोविंद चाचणे (सा.क्र.१), फिर्यादी अमीत शाम भगत (सा.क्र.२) व पंच साक्षीदार सदाशिव सखाराम मोडके (सा.क्र.३) यांची साक्ष अनुक्रमे नि.क्र.०३, ०६ व ०९ वर नोंदविण्यात आली आहे. अभियोग पक्षाचा पुरावा नि.क्र.१ वरील आदेशानुसार बंद करण्यात आला.

**<u>मुद्दा क्रमांक १ बाबतः</u>–**

७. अभियोग पक्षातर्फे पंच साक्षीदार गणेश चाचणे (सा.क्र.१) व पंच साक्षीदार सदाशिव मोडके (सा.क्र.३) यांनी सरतपासात असे कथन केले आहे की, त्यांच्यासमक्ष कोणतीही कारवाई व पंचनामा झाला नाही. पंचनाम्यावर त्यांची सही असल्याचे त्यांनी मान्य केले परंतु त्यातील मजकूर त्यांना माहिती नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. सरकार पक्षाच्या बाजूने सहाय्य होईल असा पुरावा अभिलेखावर आणता आलेला नाही. या पंच साक्षीदाराचे साक्षी जबाबावरुन त्यांनी अभियोग पक्षाच्या कथनास मदत केली नाही. सबब, सदर पंच साक्षीदाराचा तोंडी पुरावा अभियोग पक्षास उपयुक्त ठरत नाही.

८. अभियोग पक्षातर्फे फिर्यादी ए. एस. भगत (सा.क्र.२) यांनी सरतपासात असे कथन केले की, दिनांक ०३.०२.२०२५ रोजी सदर साक्षीदार, व त्यांचे सहकारी दोन पंच असे बातमीच्या ठिकाणी म्हणजे

वांझळोशी येथे खाजगी वाहनाने गेले. वाहन थांबवुन वांझळोशी गावच्या पश्चिमेकडे गेले. तेथे एका कच्च्या झोपडीत एक इसम त्याच्या ताब्यात ड्रम, कॅनसह हातभट्टीची गावठी दारु विक्री करताना मिळून आला. आरोपीकडे २४० लीटर दारु मिळून आली. आरोपीने त्याचे नाव पांडुरंग लक्ष्मण पवार असे सांगितले. जप्त मुद्देमालापैकी एक बॉटल रासायनिक परिक्षणाकरिता घेतली. सदर साक्षीदार व दु.निरिक्षक यांनी पंचनामा केला. त्यांनतर मुद्देमाल व आरोपी पोलीस स्टेशनला नेले व तक्रार दिली.

९. उलटतपासामध्ये फिर्यादी फिर्यादी ए. एस. भगत (सा.क्र.२) यांनी मान्य केले की, घटनास्थळी ते ज्या वाहनाने गेले त्याचा क्रमांक तक्रारीत नमूद नाही. वांझळोशी येथे जंगली भाग असून तेथे कोणीही येवु जावु शकते. गुप्त बातमीच्या आधारे छापा टाकण्यासाठी जातात तेव्हा ब-याचवेळी बेवारस मुद्देमाल आढळून येतो. ज्या ठिकाणी त्यांनी पंचनामा केला ते ठिकाण कोणाच्या मालकीचे आहे याबाबत कागदपत्रे पाहिले नाहीत. सदर साक्षीदार यांनी पुढे मान्य केले की, त्यांच्या कार्यालयात मुद्देमाल ठेवण्यासाठी अद्ययावत व्यवस्था नाही. २ मार्च ते २५ मार्च च्या दरम्यान मुद्देमाल कोणत्या स्थितीत होता हे त्यांना माहिती नाही. मुद्देमाल प्रयोगशाळेत पोहोचविण्यासाठी गेले त्यावेळचे तिकीट उललब्ध नाही.

१०. अभियोग पक्षाने रासायनिक परिक्षणाचा अहवाल अभिलेखावर दाखल केला आहे. परंतु, प्रस्तुत प्रकरणातील मुद्देमाल हा आरोपीच्याच ताब्यातून जप्त केला ही बाब जप्ती पंच साक्षीदाराच्या पुराव्यावरुन संशयापलिकडे सिद्ध होत नाही. अभियोगपक्षाच्या कथनानुसार

दिनांक ०२.०३.२०२५ रोजी घटना घडलेली असून नमुना बॉटल या रासायनिक परिक्षणासाठी दिनांक २३.०५.२०२५ रोजी पाठविण्यात आलेले आहे. अभियोगपक्षाने सदर नमुना बॉटल या रासायनिक परिक्षणासाठी तीन महिना विलंबाने पाठविल्या आहेत. अशा परिस्थितीत सदरच्या नमुना बॉटल या तीन महिन्याच्या कालावधीत कोठे व कशा परिस्थितीत होत्या याबाबत अभियोगपक्षाने कोठेही कथन केलेले नाही. तसेच मुद्देमाल मोरर यांना तपासले नाही. त्यामुळे जप्त मुद्देमाल हाच वैज्ञानिक प्रयोगशाळेत तपासण्यासाठी पाठविला होता हे अभिलेखावर संशयापलिकडे सिद्ध होत नाही. म्हणून प्रस्तुतचा रासायनिक परिक्षणाचा अहवाल आरोपी विरुद्ध गुन्हा सिद्ध करण्यास उपयुक्त ठरत नाही.

**११.** अभियोगपक्षाच्या एकंदरीत पुराव्यावरुन फिर्यादीने जरी आरोपीच्या ताब्यातून मुद्देमाल मिळून आल्याचे कथन केले असले तरी पंच साक्षीदार यांनी त्यांच्या समक्ष आरोपीच्या ताब्यातून काहीही जप्त केले नसल्याचे कथन केले आहे. त्यामुळे फिर्यादी (सा.क्र.२), पंच साक्षीदार (सा.क्र.१) व सदाशिव (सा.क्र.३) यांचा पुरावा एकमेकांशी सुसंगत नाही. अभियोगपक्षाने फिर्यादीच्या पुराव्यास पुष्टी देण्याकरिता इतर कोणत्याही साक्षीदाराचा पुरावा अभिलेखावर नोंदविलेला नाही. अशा परीस्थितीत सदर साक्षीदाराचे कथन संशयास्पद आहे. त्यामुळे पोलीस साक्षीदारांच्या पुराव्यावरुन आरोपीस दोषी गृहित धरता येत नाही. अशा परिस्थीतीत आरोपीवर ठेवलेला दोषारोप निर्विवादपणे सिद्ध होण्याइतपत सक्षम पुरावा या न्यायालयापुढे आलेला नाही. करीता सबब हे न्यायालय मुद्दा क्र. १ चा

निष्कर्ष नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्रमांक ०२ बाबतः–**

**१२.** अभियोग पक्ष या न्यायालयाने आरोपीवर निश्चीत केलेला मुं.वा.प्रोव्ही. ॲक्ट कायदा कलम ६५ (ई) अन्वयेचे दोषारोप आरोपीविरुद्ध निर्विवादपणे सिद्ध करण्यास असफल ठरलेला आहे. त्यामुळे पर्यायाने आरोपी ही निर्दोषमुक्त होण्यास पात्र आहे. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल प्लॅस्टीक ड्रम, बरणी, कॅन, बादली, मग व पाच स्टीलचे ग्लास चा अपील कालावधी संपल्यानंतर कलेक्टर, राज्य उत्पादन शुल्क यांचेकडे पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी पाठविणे न्यायोचित आहे. वरील सर्व कारणांमुळे हे न्यायालय खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**अ.** आरोपी **पांडुरंग लक्ष्मण पवार** यास मुं.वा.प्रोव्ही. ॲक्ट कायदा कलम ६५(ई) अन्वये असलेल्या दोषारोपातून फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करणेत येत आहे.

**ब.** प्रस्तुत कामी जप्त असलेला मुद्देमाल दारु नाश केली नसल्यास विल्हेवाट लावण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने जप्त (Confiscate) केली नसल्यास राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे अपील कालावधीनंतर नाश करणेसाठी पाठविण्यात यावे. जप्त प्लॅस्टीक ड्रम, बरणी, कॅन, बादली, मग व पाच स्टीलचे ग्लास मुल्यहिन असल्यामुळे अपील कालावधीनंतर नाश करणेत

यावी.

**क.** आरोपीचे वैयक्तिक जात मुचलके व जामीन कदबे रद्द करण्यात येते.

**ड.** आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७ अ प्रमाणे प्रत्येकी रक्कम रुपये १५०००/– चा जामीन द्यावा.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)**

sd/–

माणगांव, श्रीमती अ.प्र.मानव (अ.ब.सोनटक्के)
दिनांक : ०६.०६.२०२६. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, माणगांव.